

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते धनादेश स्वीकारताना शहाजी ठाकूर, मंगेश शिनगारे.

# खेड शिक्षण प्रसारक मंडळाची खेळाडूंना मदत

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

पतियाळा पंजाब येथे सुरू असलेल्या वेटलिफ्टिंगच्या राष्ट्रीय शिबिराकरिता निवड झालेले हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील वैष्णव ठाकूर आणि सारिका शिनगारे या विद्यार्थ्यांना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने प्रत्येकी २५ हजारांचे आर्थिक साहाय्य देण्यात आले.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, क्रीडाशिक्षक प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे उपस्थित होते. शहाजी ठाकूर, मंगेश शिनगारे या पालकांनी धनादेशाचा स्वीकार केला.

संस्थाध्यक्ष ॲड. बुट्टे पाटील यांनी शिनगारे व ठाकूर यांची पतियाळा येथे होणाऱ्या राष्ट्रीय शिबिराकरिता निवड झाल्याबद्दल आनंद व्यक्त करून कॉमनवेल्थ स्पर्धेकरिता भारतीय वेटलिफ्टिंग संघात निवड होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहे, असे त्यांनी सांगितले.

शहाजी ठाकूर, मंगेश शिनगारे यांनी संस्थेने केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोणारी यांनी केले. आभार प्रा. तानाजी पिंगळे यांनी मानले.